# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# मतदान करूया! लोकशाहीचा धागा होऊया!

## विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी थांबली : आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी थांबल्या आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी थांबली आहे. आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी थांबल्या आहेत. राजकीय पक्षांसह सर्वच उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराचे काम केलेले आहे. आता वेळ आहे लोकशाहीचा ‘राजा’ असलेल्या मतदारांची, बुधवारी (ता. २०) होणाऱ्या मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याची. प्रत्यक्ष मतदान करण्याची आणि इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करण्याची. चला तर मग, मतदान करूया! लोकशाहीचा धागा होऊया.!

विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (ता. २०) मतदान होत आहे. त्यात शहरातील चिंचवड, पिंपरी आणि भोसरी मतदारसंघातील एक हजार ४५४ मतदान केंद्र असून १६ लाख ६३ हजार ६५४ नागरिक मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणूक विभागाकडून मतदानाची तयारी पूर्ण झाली असून, मतदान केंद्र अधिकारी व कर्मचारी आवश्यक साहित्यासह मंगळवारी (ता. १९) दुपारीच आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचले.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक विभाग आणि महापालिकेने वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न केले आहेत. निवडणूक विभागाने प्रत्येक मतदार संघात प्रत्येकी सहा मतदान केंद्र लक्षवेधी केली आहेत. यामध्ये युनिक, युवा, महिला, दिव्यांग, परदानशीन आणि मॉडेल अशी मतदान केंद्रांची वर्गवारी केली आहे. महापालिका शहरातील तीनही मतदारसंघातील प्रत्येकी पाच या प्रमाणे १५ मतदान केंद्रांना हरित मतदान केंद्र केले आहे. या केंद्रांवर औषधी वनस्पती, सदाहरित वनस्पती, शोभेची झाडे-झुडपे, फुले व फळांच्या वनस्पती यांचे प्रदर्शन लावले आहे.



### प्रशासनाने हे केले

» मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आवारात मतदान केंद्र अध्यक्ष, सूक्ष्म निरीक्षक या व्यतिरिक्त उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी आणि मतदारांना मोबाईल नेण्यास निवडणूक आयोगाने प्रतिबंध केला आहे. मतदार केंद्रावर मोबाईल आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, छायाचित्रीकरण करण्यासही बंदी आहे. मोबाईल, स्मार्टफोन, स्मार्टवॉच, वायरलेस सेट आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणे नेण्यासही मनाई आहे. मतदानाच्या दिवशी अनवधानाने एखाद्या मतदाराने मोबाईल मतदान करण्यासाठी सोबत आणल्यास मतदान केंद्राच्या१०० मीटरच्या अंतरावर ठेवावा लागेल. तसेच सर्व उमेदवार आणि मतदारांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शन सूचनांचे पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले आहे.

### मतदारांसाठी केंद्रावरील सोयी-सुविधा

- मतदान केंद्र इमारतीच्या आवारात केंद्राच्या रचनेचा नकाशा
- ज्येष्ठ, दिव्यांगांसाठी मतदान केंद्रांवर रॅम्प
- पिण्याची पाण्याची व्यवस्था
- सावलीसाठी मंडप
- रांगेमध्ये उभे राहण्याऐवजी आवश्यकतेनुसार बसण्यासाठी बाक
- दिव्यांगांसाठी व्हील चेअर व मदतनीस
- दिव्यांग व ८५ वर्षांवरील मतदारांना केंद्रावर ने-आण करण्यासाठी रिक्षा
- मतदान केंद्रांवर मतदारांचे नाव शोधण्यासाठी सुविधा (बीएलओ)
- मतदारांच्या मदतीसाठी एनसीसी व एनएसएसचे स्वयंसेवक
- आठपेक्षा अधिक मतदान केंद्रांच्या ठिकाणी कलर कोडींगचा वापर

### विधानसभानिहाय मतदान केंद्र व मतदार

| मतदारसंघ | उमेदवार | मतदान केंद्र | पुरुष | महिला | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| चिंचवड | २१ | ५६४ | ३,४८,४५० | ३,१५,११५ | ५७ | ६,६३,६२२ |
| पिंपरी | १५ | ३९८ | २,०४,००५ | १,८७,५६८ | ३४ | ३,९१,६०७ |
| भोसरी | ११ | ४९२ | ३,२८,२८० | २,८०,०४८ | ९७ | ६,०८,४२५ |
| मावळ | ६ | ४०२ | १,९७,४३६ | १,८८,७२३ | १३ | ३,८६,३०१ |
| एकूण | ४७ | १,४५४ | ८,८०,७३५ | ७,८२,७३१ | १८८ | १६,६३,६५४ |

# शहरातील 15 हरित मतदान केंद्रावर विविध वनस्पतींचे माहिती प्रदर्शन; पिंपरी चिंचवड महापालिकेचा अभिनव उपक्रम

## पिंपरी,चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी 5 अशा एकूण 15 मतदान केंद्रांवर महापालिकेच्या वतीने “हरित मतदान केंद्र” ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी,चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी ५ अशा एकूण १५ मतदान केंद्रांवर महापालिकेच्या वतीने “हरित मतदान केंद्र” ही संकल्पना राबविण्यात येत आहे. या मतदान केंद्रांवर खास मतदारांसाठी विविध पाम प्रजाती, शोभिवंत झाडे, फळझाडे, आयुर्वेदिक औषधी वनस्पती अशा विविध वनस्पतींचे माहिती प्रदर्शन भरविण्यात येत असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप नोडल विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्या नियंत्रणाखाली मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून मतदानाच्या दिवशी महापालिकेच्या वतीने शहरातील सर्व मतदान केंद्रांवर विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने पिंपरी,चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी ५ अशा एकूण १५ मतदान केंद्रांवर महापालिकेच्या वतीने “हरित मतदान केंद्र” ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत असल्याची माहिती आयुक्त सिंह यांनी दिली.

हरित मतदान केंद्रांवर राबविण्यात येणाऱ्या वनस्पती प्रदर्शनातील “शोभिवंत झाडे माहिती प्रदर्शनामध्ये अनंत कुंदा, हॅमेलीया, जट्रोफा, ॲलामेंडा,जास्वंद आदी वनस्पतींचा समावेश आहे. तर “फळझाडे माहिती प्रदर्शनामध्ये” आवळा, जांभूळ, चिंच, पेरू, आंबा, सीताफळ, फणस आदी फळझाडांचा समावेश आहे. तसेच “आयुर्वेदिक औषधी वनस्पती” माहिती प्रदर्शनामध्ये कडूनिंब,अडुळसा,बकुळ,उंबर,कोरफड,शतावरी, पारिजातक आदी वनस्पतींचा समावेश असून “पाम प्रजाती” माहिती प्रदर्शनामध्ये आरेका,रॉयल, फिनिक्स, बिस्मार्कीया, बॉटल,रॅफिक्स आदी प्रजातींचा समावेश असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली.



### पिंपरी मतदारसंघातील हरित मतदान केंद्रे..

» पिंपरी विधानसभा मतदारसंघात महापालिकेच्या एकूण ५ हरित मतदान केंद्रे स्थापित करण्यात आले आहेत. यामध्ये निगडी येथील ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय से.२५ येथील मतदान केंद्र क्र.५, आणि सेंट उर्सुला हायस्कूल तसेच संभाजीनगर येथील कमल नयन बजाज हायस्कूल मतदान केंद्र क्र.४१, दापोडी येथील गणेश इंग्लिश मेडियम स्कूल मतदान केंद्र क्र.३७० आणि हुतात्मा भगतसिंग विद्यामंदीर या शाळांच्या ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रांवर “हरित मतदान केंद्र” ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

### चिंचवड मतदारसंघातील हरित मतदान केंद्रे..

» चिंचवड विधानसभा मतदारसंघात नवी सांगवी येथील बाबूरावजी घोलप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मतदान केंद्र क्र.४९९ , रावेत गाव येथे सिटी प्राइड स्कूलमधील मतदान केंद्र क्र. ४४, पिंपळे सौदागर येथील पी.के. इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मधील मतदान केंद्र क्र. ३५८ आणि जी.के. गुरुकुल गोविंद गार्डन या ठीकाणी तसेच पिंपळे गुरव येथील महापालिकेची मुला मुलींची शाळा क्र. ५४/१ येथे हरित मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. .

### भोसरी मतदारसंघातील हरित मतदान केंद्रे

» भोसरी विधानसभा मतदारसंघात इंद्रायणी नगर येथील स्टर्लिंग स्कूल इमारत क्र. १ आणि स्वामी समर्थ इंग्लिश मेडियम स्कूल याठीकाणी तसेच शाहूनगर येथील डी.वाय.पाटील इंग्लिश मेडियम स्कूल, चऱ्होली येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळा, दिघी येथील रामचंद्र गायकवाड प्राथमिक शाळा या ठीकाणी हरित मतदान केंद्र स्थापित करण्यात आले आहेत. .

# खर्च तफावतीतील तिघांना तर गुन्ह्याची माहिती प्रसिद्ध न करणाऱ्या दोघांना नोटीसा..

## चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांची माहिती...

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघ निवडणूकीच्या अनुषंगाने उमेदवारांची दैनंदिन तिसरी खर्च तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक प्रेम प्रकाश मीना यांच्या उपस्थितीत तसेच खर्च तपासणी समन्वयक अश्विनी मुसळे, सहाय्यक निवडणूक खर्च निरीक्षक पवन यादव, रमेश फडतरे आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघ खर्च तपासणी कक्ष प्रमुख शिवाजी ठोंबरे यांच्या अधिपत्याखाली थेरगाव येथील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयात पार पडली.



भारत निवडणुक आयोग कार्यालयाकडील निवडणुक खर्च संनियंत्रण संदर्भातील मार्गदर्शक सूचनेनुसार उमेदवारांनी केलेली दैनंदिन खर्चाची तपासणी तीन टप्यात करण्याबाबत तरतूद आहे. त्या अनुषंगाने उमेदवारांनी केलेल्या दैनंदिन खर्चाची तिसरी तपासणी दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी विहीत मुदतीत पार पडली.

तिसऱ्या खर्च तपासणीवेळी खर्च अहवाल सादर न करणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार नोटीस बजावण्यात आली आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील २१ उमेदवारांपैकी २० उमेदवारांनी निवडणूक खर्च सादर केला असून विनायक सोपान ओव्हाळ (अपक्ष) उमेदवाराने तीनही वेळा झालेल्या खर्च तपासणीवेळी निवडणूक खर्च सादर केला नाही. त्यामुळे या उमेदवाराला निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी नोटीस बजावली आहे.

ज्या उमेदवारांच्या दैनंदिन खर्चामध्ये तफावत आढळली त्यांना देखील नोटीस बजावण्यात आली आहे. राजेंद्र कुंडलिक गायकवाड (बहुजन समाज पार्टी) आणि जावेद रशीद शेख या उमेदवारांच्या खर्चात तफावत आढळली आहे. अनिल बाबू सोनवणे (अपक्ष) या उमेदवाराच्या दैनंदिन खर्चाचे बँक खाते व रोकड खाते यात तफावत आढळली आहे. तसेच मारुती साहेबराव भापकर (महाराष्ट्र स्वराज्य पक्ष) आणि रुपेश रमेश शिंदे (अपक्ष) या उमेदवारांनी गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत प्रसारमाध्यमांवर जाहिरात प्रसिद्ध केली नाही. या सर्व उमेदवारांना देखील नोटीस बजावली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून प्रेम प्रकाश मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी उमेदवारांचा निवडणूक खर्च आदी अनुषंगाने माहिती घेतली असून संबंधित अधिकाऱ्यांना ते मार्गदर्शन करत आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवाराच्या प्रचार खर्चाची मर्यादा ४० लाख रूपये इतकी आहे. चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये एकूण २१ उमेदवार निवडणूक लढवत असून त्यांचे दररोजच्या खर्चाचे लेखे आणि खर्चाच्या पावत्या या लेखांकन पथकाकडे जमा केल्या जातात. त्याचवेळी व्हिडिओ नियंत्रण पथकाकडून आलेल्या अहवालानुसार शॅडो रजिस्टरमध्ये उमेदवाराचा रोजचा प्रचारखर्च नोंदवला जातो. त्याचप्रमाणे इतर पथकाकडून रोकड अथवा इतर जप्ती झाल्यास त्याचीही नोंद लेखा पथकाकडून घेतली जाते. लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१ कलम ७८ अन्वये रिंगणात उभ्या असलेल्या सर्व उमेदवारांनी निवडणुकीच्या निकालाच्या दिवसापासून ३० दिवसाच्या आत निवडणुकीबाबतचा हिशोब निवडणूक आयोगास सादर करणे आवश्यक आहे.

# पावणेदोन कोटींची रक्कम, 93 शस्त्र आणि दीड कोटीपेक्षा अधिकचा गांजा आणि दारू जप्त..

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड पोलीसांकडून व्यापक प्रतिबंध कारवाई करण्यात आली.

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुक ही भयमुक्त व पारदर्शक व निःपक्षपातीपणे पार पाडता यावी यासाठी आचारसंहिते दरम्यान पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड पोलीसांकडून व्यापक प्रतिबंध कारवाई करण्यात आली.



नाकाबंदी दरम्यान विविध ठिकाणी अवैधरित्या वाहतुक करीत असलेली एकुण १,७६,१७,५१०/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. अवैध अग्निशस्त्रे ४९ व १०० काडतुसे व कोयता, तलवार अश्या प्रकारची ९३ घातक धारदार शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत.


तसेच १,१४,३२,३८२ रु किंमतींचा २,४१,२५९ लिटर अवैध दारुसाठा मोठ्या प्रमाणात जप्त करन्यात आलेला आहे. ३७,९३,०००/- रुपये किंमतीचा ४१ किलो ४६२ ग्रॅम गांजा व इतर अंमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. विविध कायदयाअंतर्गत आतापर्यंत एकुण १,४३८ व्यक्तींविरोधात प्रतिबंधक कारवाई करणेत आलेले आहे. १० गुन्हेगारी टोळयातील ४१ आरोपींच्या विरुध्द मोका कायदयान्वये कारवाई करण्यात आलेली असुन ०७ आरोपींना स्थानबध्द करणेत आलेले आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत निवडणुकींचे अनुषंगाने तपासणीकरीता १७ फलॉईग स्कॉड तयार करण्यात आलेले असुन त्याकरिता ३६ अधिकारी व १०२ अंमलदार नेमण्यात आलेले आहेत व स्टॅटिक सर्व्हिलन्सची १४ पथके तयार करण्यात आलेली असुन त्याकरीता ८४ अंमलदार यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील एकुण शस्त्रपरवाना धारकांपैकी ९९ % शस्त्रे जमा करणेत आली आहेत. मोठया प्रमाणावर कोंबिंगदवारे गुन्हेगारांची व नाकाबंदीद्वारे वाहनांची कसुन तपासणी करणेत येत आहे.

दरम्यान बालेवाडी स्टेडियम येथे होणाऱ्या पिंपरी व भोसरी या विधानसभा मतदारसंघाच्या मतदान मोजणी केंद्रास व स्ट्रॉंग रूमला पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी भेट देऊन सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पाहणी केली व आवश्यक त्या सुचना केल्या.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोबाईल बंदी पीएमआरडीए प्रशासनाच्या सूचना

## महत्वाची कागदपत्रे मोबाईलच्या माध्यमातून बाहेर पाठवली जाऊ नये, यासाठी खबरदारी



**पुणे | प्रतिनिधी**

पीएमआरडीए अंतर्गत गोपनीय माहिती, महत्वाची कागदपत्रे मोबाईलच्या माध्यमातून बाहेर पाठवली जाऊ नये, यासाठी पीएमआरडीएकडून खबरदारी घेतली जात आहे. हा प्रकार थांबवण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मोबाईल वापरण्यावर बंदी घालण्यात येणार आहे. त्याची हळूहळू अंमलबजावणी केली जात आहे. एखाद्या कंत्राटी कर्मचाऱ्याकडे मोबाईल आढळून आल्यास तो जप्त करण्यात येणार असल्याचे प्रत्येक विभागाला कळविण्यात आले आहे.

पीएमआरडीए प्रशासनामार्फत साधारणतः महिन्याभरापूर्वी नव्या कंपनीला कंत्राटी कर्मचाऱ्यांचा ठेका दिलेला आहे. तो देण्यापूर्वी नियम व अटींमध्ये मोबाईल वापरण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले होते. त्याची अंमलबजावणी आता केली जात आहे. मोबाईलचा गैरवापर होऊ शकतो. अनेक कर्मचारी मोबाईलमध्ये वेळ घालवतात. आयुक्तांच्या निर्दशनास ही बाब आल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्यामार्फत प्रत्येक विभागाला आपला वैयक्तिक मोबाईल कामाच्या वेळेत वापरता येत नसल्याचे कळविण्यात आले आहे.

# पिंपरीत मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

## कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रनिहाय साहित्याचे वाटप होणार : साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. पिंपरी मतदारसंघात ३ लाख ९१ हजार ६०७ इतके मतदार आहेत. त्याच्यासाठी ३९८ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. बुधवारी (दि.२०) मतदान प्रक्रिया पार पडणार असून मतदान केंद्रावर आवश्यक असणा-या साहित्याचे वितरण करण्यात येईल, अशी माहिती. साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी दिली.



पिंपरी (अ. जा. राखीव) विधानसभा मतदारसंघातील मतदान बुधवारी (दि. २० नोव्हेंबर २०२४) रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे. निवडणूक साहित्याचे वाटप करण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे साहित्य जमा करून घेतले जाणार असून स्वीकृतीचे काम चिंचवडच्या ऑटोक्लस्टर प्रदर्शन केंद्र क्र. १ व २ या जागेमध्ये होणार आहे. साहित्य वाटप करण्यासाठी ५५ अधिकारी आणि स्वीकृतीसाठी ४५ कर्मचारी, नियंत्रण पथक नियुक्त करण्यात आले. साहित्य वाटपासाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचारी सकाळी २१ टेबलद्वारे मतदान केंद्रनिहाय साहित्य वाटप कामकाजाला सुरुवात करणार आहेत. नेमून दिलेल्या मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांची हजेरी घेऊन मतदान केंद्राचे साहित्य मतदान केंद्राध्यक्ष व संबंधित मतदान अधिकारी यांच्या ताब्यात देणार आहे. मतदान केंद्रनिहाय मतदान केंद्राध्यक्ष आणि साहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष याकडे ईव्हीएम म्हणजेच बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यंत्र, आवश्यक साहित्य तसेच मतदान प्रक्रियेविषयीचे विविध पाकिटे आणि लिफाफे आदी साहित्य सुपूर्द करण्यात येणार आहे.

पिंपरी मतदारसंघामध्ये एकूण ३,९१,६०७ मतदार असून ३९८ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी सुमारे १,७७७ (राखीवसह) अधिकारी-कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. साहित्य घेऊन जाणाऱ्या प्रत्येक मतदान केंद्रासाठी पोलीस बंदोबस्त असून जीपीएस प्रणाली अद्यावत ठेवली आहे. अनुपस्थित कर्मचाऱ्यांच्या बदली काम करण्यासाठी सुमारे २०% मतदान अधिकारी कर्मचारी राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच अग्निशामक दलाचे वाहन, पाण्याचा टँकर, शीघ्र कृती दलाचे पथक, वैद्यकीय पथकासह रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येणार आहे.

प्रत्येक केंद्राच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. विधानसभा निवडणूक मतदानाच्या अनुषंगाने पिंपरी विधानसभा मतदारसंघात सर्व तयारी पूर्ण झाली असून ही निवडणूक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज आहे.

### वाहतुकीची व्यवस्था

» मतदान साहित्य ताब्यात घेतल्यानंतर नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामध्ये ७१ बसेस आणि ०४ जीपची व्यवस्था करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी साहित्य वितरण ठिकाणी वाहतूक व्यवस्थेचा तपशील दर्शनी भागात लावण्यात आलेला आहे. मतदान अधिकारी कर्मचारी यांचे वाहनाचे पार्किंगची सोय करणेत, आलेली आहे.

### 398 केंद्रांवर वेब कॅमेरे

» पिंपरी विधानसभा मतदारसंघात निश्चित केलेल्या ३९८ मतदान केंद्रांवर वेब कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. तयारी अंतिम टप्प्यात आहे. मतदानाच्या अनुषंगाने निवडणूक विभागामार्फत निवडणूक विषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांना मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष करावयाच्या कामकाजाबाबत तसेच साहित्य वितरण यापूर्वी कर्मचाऱ्यांना विहीत नमुन्यातील माहिती भरताना घ्यावयाची काळजी, ईव्हीएम यंत्रातील तांत्रिक अडचणी कशा दूर करावयात, साहित्य स्वीकारताना व जमा करताना काय काळजी घ्यावी याबाबत तिसरे व अंतिम प्रशिक्षण दिले जाणार आहे.

# मतदानासाठी आवश्यक साहित्याचे वितरण, मतदान यंत्रे केंद्रांकडे रवाना

## सर्व पथके विहीत वेळेत मतदान केंद्रांकडे रवाना : निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी चिंचवडमधील मतदान केंद्रांवर मतदानासाठी आवश्यक साहित्य वितरण आज पार पडले असून सर्व पथके विहीत वेळेत मतदान केंद्रांकडे रवाना झाली, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली.



चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूकीसाठी बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून या मतदान प्रक्रियेसाठी सुमारे ३ हजार १३० अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून ४८ सेक्टर ऑफिसर्सची नेमणूक करण्यात आली आहे. आज थेरगाव येथील स्व. शंकर (अण्णा) गावडे कामगार भवन येथून सकाळी ८ वाजेपासून मतदान साहित्य वितरण प्रक्रियेला सुरूवात झाली. प्रारंभी सर्व मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्र अधिकारी यांना तिसरे अंतिम प्रशिक्षण देऊन मतदान प्रक्रियेबद्दल तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ६ लाख ६३ हजार ६२२ मतदार असून ५६४ मतदान केंद्रे आहेत. यासाठी आवश्यक असणारे १३५३ बॅलेट युनिट, ६७६ कंट्रोल युनिट आणि ७३३ व्हीव्हीपॅट यंत्र मतदान पथकनिहाय ताब्यात देण्यात आले. तसेच ५६४ मतदान केंद्रांसाठी प्रत्येकी २ बॅलेट युनिट, १ कंट्रोल युनिट व १ व्हीव्हीपॅट यंत्रे वाटप करण्यात आली असून २२५ बॅलेट युनिट, ११२ कंट्रोल युनिट आणि १६९ व्हीव्हीपॅट यंत्रे राखीव ठेवण्यात आली आहेत. यासोबतच विविध लिफाफे, स्टेशनरी, ओआरएससह प्रथमोपचारपेटी, दिशादर्शक फलक, मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी आवश्यक साहित्य, विविध अहवालाच्या प्रती आणि मार्गदर्शक सूचना साहित्य देखील यावेळी सुपूर्द करण्यात आले. या पथकांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवर घेऊन जाण्यासाठी वाहतूक व्यवस्था करण्यात आली होती. बसेस, जीप तसेच इतर वाहनांवर केंद्र क्रमांक दर्शविण्यात आला होता.

यावेळी नियोजनबद्ध पद्धतीने साहित्याचे वितरण करून पथकांना वाहनांमध्ये बसवून विहीत वेळेत केंद्रस्थळी पोहोचविण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली संपूर्ण प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्यात आले व साहित्य वाटपाच्या ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शिवाय प्रत्येक पथकासोबत स्वतंत्र पोलीस पथके देण्यात आली आहेत.

# 6,594 मतदान केंद्रांचे होणार वेब कास्टिंग

## पुणे विभागातील आठ विधानसभा मतदारसंघात एकूण 8,462 मतदान केंद्रे

**पुणे | प्रतिनिधी**

सार्वत्रिक विधानसभा मतदारसंघाच्या प्रचाराची रणधुमाळी संपली. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुणे जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून २० नोव्हेंबर रोजी मतदानाची जय्यत तयारी केली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे विभागातील आठ विधानसभा मतदारसंघात एकूण ८,४६२ मतदान केंद्रे असणार आहेत. त्यापैकी तब्बल ६,५९४ मतदान केंद्रांचे वेब कास्टिंग केले जाणार आहे. तब्बल ८८,४९,५९० मतदार ईव्हीएमद्वारे उमेदवारांचे भवितव्य ठरविणार आहेत.



"मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्र जवळ नसल्यास अन्य १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येईल," असेही जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी सांगितले.

**मतदार ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य**

छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र सादर करू न शकणाऱ्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र (जॉब कार्ड), बँक किंवा टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्रासह पासबुक, श्रम मंत्रालयाच्या योजनेंतर्गत दिलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहनचालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), स्थायी खाते क्रमांक (पॅन कार्ड), राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक (आरजीआय) यांनी दिलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), छायाचित्र असलेली निवृत्तिवेतनविषयक कागदपत्रे, केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र या १२ पुराव्यांचा समावेश आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार छायाचित्र ओळखपत्र असल्यास मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक पुरावा सोबत न्यावा.

### जिल्ह्यात 37 कोटी 44 लाख रुपये रक्कम जप्त

» निवडणूक आयोगाच्या टीमसह स्थानिक पोलीस पथकांनी पुणे जिल्ह्यात विविध भागात गाड्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यामध्ये प्रचार सुरू झाल्यापासून १८ नोव्हेंबरपर्यंत तब्बल ३७ कोटी ४४ लाख रुपये रक्कम जप्त करण्यात आली असून शासकीय कोषागार येथे जमा केल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.

### ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांचे गृहमतदान पूर्ण

» ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या १,९२५ ज्येष्ठ नागरिकांनी गृहमतदानाचा हक्क बजाविला. दिव्यांग ३३९ व्यक्तींनी गृहमतदान केले. टपालाद्वारे अनुपस्थित २,१६५ मतदार तर निवडणूक कर्तव्यांवर असलेल्या १५,६०२, शासकीय सेवेतील ५,६०५ तर ईटीपीबीएसद्वारे ५,६०५ मतदान झाले.

# ..अखेर बोरी पार्धीतील बिबट्या जेरबंद

## मतदानासाठी मतदार छायाचित्र ओळखपत्र नसल्यास अन्य 12 प्रकारचे पुरावे ग्राह्य

**पुणे | प्रतिनिधी**

गेली अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर वन विभागला दौंड तालुक्यात बिबट्या जेरबंद करण्यात यश आले आहे. बिबट्याने एका अडीच महिन्याच्या चिमुरड्याचा जीव घेतल्या नंतर वन विभागला ही जाग आली आहे.



या बाबत माहिती अशी की, दौंड तालुक्यातील बोरीपार्धी येथे रविवार दि.१७ रोजी सायंकाळी ४ वा.सुमारास बाळासाहेब टेंगले यांच्या उसाच्या शेतात करण मोरे हे आपल्या पत्नी सह ऊस तोडणीचे काम करीत होते. आपल्या लहान मुलाला झोळीत जोपविले होते.

याच दरम्यान बिबट्याने या झोळीत झोपविलेल्या विष्णू मोरे (वय अडीच महिने) याच्यावर हल्ला केला. यावेळी मजुरांनी बाळाला बिबट्याच्या तावडीतून सोडविले मात्र विष्णू हा गंभीर जखमी झाल्याने त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता.

या दरम्यान केडगाव, बोरीपार्धी परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे तसेच पाळीव जनावरांवर हल्ल्याचे प्रकार सातत्याने घडत असल्याचे ग्रामस्थांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविले होते. मात्र वन विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता.

गेल्या तीन महिन्यात एकही बिबट्या जेरबंद करण्यास वन विभागाला यश आले नाही. हीच गोष्ट जागी असतानाच यामध्ये झालेल्या बिबट्याच्या हल्ल्यात लहान बाळाला आपला जीव गमवावा लागला असल्याने ग्रामस्थांनी वन विभागाच्या विरोधात आक्रमक पाऊले उचलली. त्यानंतर याची दखल घेत सोमवार दि २८ रोजी वन विभागाने पिंजरा लावून बोरीपार्धी परिसरातून बिबट्या जेरबंद केला असल्याची माहिती दौंडचे वन परिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांनी दिली आहे.

या बाबत माहिती देताना वन परिक्षेत्र अधिकारी राहुल काळे म्हणाले की, बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत चालला होता. बिबट मानव संघर्ष होऊ नये या हेतूने हि खबरदारी घेण्यात आली असून मुख्य वन संरक्षक प्रादेशिक पुणे एन आर प्रवीण, उप वन संरक्षक महादेव मोहिते, वन संरक्षक अधिकारी दीपक पवार यांनी घटनास्थळाला भेट दिली त्यांच्या मार्गदर्शना खाली ही मोहीम हाती घेत परिसरात चार पिंजरे बसविण्यात आले. बिबट्याच्या शोधासाठी थर्मल ड्रोन उडविण्यात आले.

दरम्यान सोमवारी दि.१८ रोजी वन विभागाला बिबट्या पिंजऱ्यात जेर बंद करण्यात वन विभागला यश आले असल्याची माहिती दौंड चे वन परिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांनी दिली. बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद केल्याने परिसरातील ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मात्र ग्रामस्थांनी अजून परिसरात किती बिबट्यांचा वावर आहे या बाबत माहिती नसून यावर देखील आपण नजर ठेवावी या बाबत ग्रामस्थांकडून सांगण्यात आले आहे. या मोहीम मध्ये योगिता नायकवाडी, वन रक्षक शितल मेरगळ, नचिकेत अवधाने, तोहीन सातारकर, आदित्य परांजपे यांनी सहभाग घेतला होता.